विशेष दिवाणी दावा क्र.२९/२०१९
निर्मला वि. सुरेखा व इतर
प्रतिवादीतर्फे सा.क्र.१ **(नि.क्र.७७)**

<u>वादीतर्फे श्री.व्ही.एस.शेळके वकिल यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरु.</u>

**११.** हे खरे आहे की, ग्रामपंचायत घर क्रमांक जूना ५०९ असून त्याचा नवीन क्र.५३० आहे. हे खरे नाही की, त्याची लांबी पुर्व-पश्चिम ४८ फुट व रुंदी दक्षिण-उत्तर ३६ फुट आहे. त्या घराची लांबी पुर्व-पश्चिम ५८ फुट व दक्षिण-उत्तर ३६ फुट आहे. हे खरे की, मी जी लांबी -रुंदी सांगितली ती वडिलोपार्जित घराची आहे. गट क्र.४३८, ४५४, ४५३, ७२५ मध्ये एकुण १० हेक्टर ८२ आर एवढी जमीन मी, माझे वडिल, भाऊ आणि बहिण यांच्या कुंटूंबाला होती, हे खरे नाही. मी सांगतो की, बहिणीचा त्यात संबंध नाही मात्र जमीन १० हेक्टर ८२ आर होती. हे खरे की, १९९१ सालच्या गुढीपाडव्याला या जमिनीच्या मी, माझा भाऊ आणि आई-वडील यांच्यात वाटण्या झाल्या. हे खरे की, मी रे.दि.मु.क्र.८९/१९९१ हा वादी क्र.२ व माझे आई-वडील यांच्याविरुध्द दाखल केला होता. हे खरे की, त्या दाव्यात गट क्र.४३८ मध्ये २ हेक्टर ५० आणि ४५४ मध्ये १ हेक्टर २२ आर एवढी जमीन माझ्या वाटपात आली. हे खरे की, त्या दाव्याच्या हुकूमनाम्यात माझे आई-वडील आणि वादी क्र.२ याला अन्य गटातील जमिनी वाटून दिल्या. हे खरे की, हुकूमनाम्याप्रमाणे आमच्या नोंदी महसुल दप्तरी झाल्या. हे खरे की, मी माझ्या हिश्शाची जमीन विकून टाकली. हे खरे की, रे.दि.मु.क्र.८९/१९९१ मध्ये मी प्रस्तुतची वादमिळकत नमूद केली नव्हती. हे खरे की, राणी सावरगाव येथे घाणा, पिठाची गिरणी आणि उजना येथील घर क्र.२४२ याचा त्या दाव्यात उल्लेख नव्हता. हे खरे की, ग्रामपंचायत घर क्र.५०९, ज्याचे एकुण क्षेत्र २७६३.९३ चौरस फुट पैकी ७९७.९८ चौरस फुट एवढे क्षेत्र वडिलांना ताब्यात मिळाले असा रे.दि.मु.क्र.८९/१९९१ मध्ये उल्लेख नाही. ७९७.९८ चौरस फुट क्षेत्राचा दस्त याकामी दाखल नाही, हे खरे नाही. राणी सावरगाव येथील ग्रामपंचायत मिळकत व उजना येथील घर क्र.२४२ वादी क्र.२ च्या हिश्शाला गेली असा उल्लेख रे.दि.मु.क्र.८९/१९९१ मधील हुकूमनाम्यात नाही, हे म्हणणे खरे नाही. हे खरे की, घर क्र.२४२

आमच्या वडिलांच्या नावे आहे. सदर घर क्र.२४२ हे घर वडिलांनी लक्ष्मण कासले यांना विकले, हे म्हणणे खरे नाही. या घराच्या खरेदीपत्रावर वादी क्र.१ व २ यांची मान्यता देणार म्हणून किंवा मोबदला स्वीकारणार म्हणून सही नाही व उपस्थितीही नाही, हे म्हणणे खरे नाही. राणी सावरगाव येथील पिठाची गिरणी, घाणा हे माझ्या वडिलांनी विकले, हे खरे नाही. नामदेवचे वारस म्हणून सदर गिरणी व घाणा माझ्या आणि वादी क्र.२ च्या ताब्यात नाही, हे म्हणणे खरे नाही. सदर गिरणी, घाणा, साळी कांडप हे आत्माराम जाधव व रमेश यांच्या मालकीचे नाही. या मिळकती माझ्या नावे आहेत. मी पुन्हा सांगतो या मिळकती माझ्या नावे नाहीत. राणी सावरगाव येथील गिरणी, कांडप व घाणा यांचे करारपत्र आत्माराम जाधव व रमेश जाधव यांना मी करुन दिले, मी सांगतो की, ते वादीच्या वतीने दिले. या संचिकेमध्ये सदर जमीन वादीच्या वतीने मी विकली असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा आहे. हे खरे की, १९९१ च्या वाटणीनंतर मी, भाऊ आणि आई-वडील हे विभक्त कुंटूंबाचे सदस्य झालो. १९९१ साली मी राणी सावरगावमध्ये कपडयांच्या व्यापार सुरु केला. सन २००४ पासून हा व्यापार बंद केला. हे खरे नाही की, त्यानंतर मी हॉटेल व्यवसाय तेथे चालू केला. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ही राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे जबाबदार प्रतिनिधी म्हणून राणी सावरगाव येथे काम करु लागले. मी व प्रतिवादी क्र.१ समाजकार्य करतो असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा नाही.

**१२.** वाद मिळकत प्रतिवादी क्र.१ च्या नावे खरेदीपत्र, बक्षीसपत्र, मृत्युपत्र वगैरे दस्तांनी झालेली नाही. प्रतिवादी क्र.१ च्या नावे वाद घराची नोंद झालेली होती. मी आणि वादी क्र.२ या दोघांच्या संमतीने ग्रामपंचायतीला बॉड देवून सन २०११ साली ही मिळकत प्रतिवादी क्र.१ च्या नावे आम्ही केली. हे खरे की, असा बॉड या दाव्यात दाखल नाही. हे खरे की, प्रतिवादी क्र.१ च्या नावे ५८ x १८ एवढया क्षेत्रफळाची नोंद झाली. सदर प्रतिवादी क्र.१ च्या नावे घर करण्याचे कारण म्हणजे तिला ऐपत प्रमाणपत्र काढायचे होते, हे आहे, हे म्हणणे खरे नाही. माझ्या हिश्शाची मिळकत म्हणून ती प्रतिवादी क्र.१ च्या नावे वर्ग झाली. हे खरे नाही की,

त्यामुळे १९६५.९८ चौरस फुटांचा मी मालक होवू शकत नाही. ५८ x १८ याचे क्षेत्रफळ १९६५.९८ एवढे येत नाही, याबद्दल मला सांगता येत नाही. लेखी कैफीयतीमध्ये आणि त्यातील नकाशात मी माझ्या हिश्शांचे दाखविलेले क्षेत्र चुकीचे दाखवलेले आहे, हे खरे नाही. हे खरे नाही की, कैफीयतीसोबत दिलेला नकाशा हा आधारहीन आहे.

**१३.** हे खरे नाही की, वादी हे नवीन वसाहतवाढीत नवे घर बांधून राहतात. हे खरे नाही की, मी राणी सावरगांव येथे कायमपणे राहतो. वाद घरात माझे आई-वडील व बहिण हे राहत होते, हे म्हणणे खरे नाही. यास माझे सांगणे की, ते वडिलांच्या हिश्शात राहत होते. आई-वडिलांच्या हयातीत वाद घराची वाटणी झाल्याचा दस्त उपलब्ध आहे. वडिलांनी त्यांच्या हयातीत आम्हा भावांना करुन दिलेला कागद उपलब्ध आहे. हे खरे की, आजरोजी तो कागद याकामी दाखल नाही. हे खरे की, माझे, वादींचे आणि आई-वडिलांचे खाणे-पिणे, देवधर्म सगळे वेगवेगळे करतात. हे खरे की, जो-तो आपल्या मिळकतींचा उपभोग वेगवेगळा घेत होता. हे खरे नाही की, मला सहाय्य करण्याची व सहानुभूतीपुर्ण वडिलांची ईच्छा होती.

**१४.** वादी क्र.२ ने त्याच्या हिश्शाची जमीन बालाजी कोकडवाड याला विकली, हे खरे आहे. हे खरे नाही की, आई-वडिलांच्या हिश्शाची जमीन वादी क्र.२ ने १९९६ साली खरेदी घेतली. आई-वडिलांची फसवणुक केली आणि त्यांच्या हिश्शांची जमीन खरेदी घेतली म्हणून प्रतिवादी क्र.१ ने वादींविरुध्द फौजदारी खटला दाखल केला, हे म्हणणे खरे आहे. तो खटला कधी केला होता हे मला आठवत नाही.हे खरे की, वादी आणि आमची बहिण भीमाबाई हिने आमच्या घरावरील पत्रे चोरले म्हणून फौ.कि.अर्ज क्र.१८९/२०१८ दाखल केला. हे खरे की, न्यायालयाने या घटनांची दखल न घेता त्या रद्द केल्या. हे खरे की, या दोन्ही आदेशांविरुध्द प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेले रिव्हीजन अर्ज सत्र न्यायालयाने फेटाळले. सदरचे खरेदीपत्र रद्द व्हावे म्हणून कोणताही दावा प्रलंबीत नाही, हे खरे

आहे.

**१५.** हे खरे की, वादी क्र.२ व अन्य ५० लोक यांनी माझ्या वडिलांचा विष पाजून खून केला म्हणून मी पोलिसात तक्रार दिली होती. माझे वडील दि.०४/०८/२००८ रोजी मयत झाले व मी तक्रार दि.१४/०३/२०१८ रोजी दिली, हे म्हणणे खरे आहे. मी राणी सावरगावला राहत असताना माझ्या मेहुणीची मुलगी शामल चामे ही आमच्याजवळ राहत होती, हे म्हणणे खरे नाही. ती माझ्याजवळ उजना येथे राहत होती. हे खरे की, तिच्यावर मी जबरी संभोग केल्याबद्दल माझ्याविरुध्द पिंपळदरी, ता.गंगाखेड येथे भा.दं.वि. कलम ३७६ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. हे खरे की, प्रतिवादी क्र.१ विरुध्द सन २००९ सालच्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी आचारसंहीता भंग केल्याचा गुन्हा दाखल झाला होता. हे खरे की, आमच्याकडे ॲटोरीक्षा होता. त्यावर कर्ज होते. हे खरे की, फायनान्सच्या वसुली व्यक्तीविरुध्द प्रतिवादी क्र.१ ने विनयभंगाचा गुन्हा दाखल केला होता व त्याचा गुन्हा रजिस्टर क्र.५४५/२०२० असा होता. हे खरे की, दि.२६/११/२०२१ रोजी तहसील कचेरी, अहमदपूर येथे मी उपोषणाला बसलो असताना जवळच्या झाडाला फास लावून घेतो असे म्हणून प्रयत्न केल्याने माझ्याविरुध्द भा.दं.वि. कलम ३०९ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. मी पुन्हा सांगतो की, मी उपोषणाला बसलो नव्हतो. हे खरे नाही की, सन २०१८ मध्ये मी व प्रतिवादी क्र.१ यांनी तहसील कचेरीपुढे सरण रचले व आत्मदाह करुन घेण्याची धमकी दिल्याने आमच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला होता. हे खरे की, मी प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे त्यांचे कनिष्ठ अधिकारी माझ्या तक्रारींची दखल घेत नाहीत म्हणून अनेकदा तक्रार अर्ज दिलेले आहेत. हे खरे की, मी त्यांच्याविरुध्द अनेकवेळा उपोषण केलेले आहेत. हे खरे की, आम्हा प्रतिवादींविरुध्द पोलिसांनी अनेकवेळा प्रतिबंधात्मक कारवाया केलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.१ विरुध्द ग्रामस्थांनी तिच्या स्त्रीत्वचा ती गैरफायदा घेते म्हणून तक्रारी केल्याचे मला माहित नाही. हे खरे की, पोलीस निरीक्षक बंगवाड व नळेगांवकर पत्रकार हे प्रतिवादी क्र.१ ची बदनामी करतात म्हणून मी तक्रार दिली होती.

**१६.** हे खरे की, वाद मिळकतीच्या ८-अ चा उतारा तहसीलदारने फेरफार केला म्हणून मी उपोषण केले. मौजे उजना येथील सरपंच ज्ञानोबा कांडनगीरे हे सरपंच नसताना पंचायतीचा कारभार बघतात म्हणून मी किनगांव पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. हे खरे की, त्या खटल्याचा तपासी अंमलदार धुळगुंडे याच्यावरही मी तक्रार दाखल केली. दि.०९/०१/२०१८ रोजी वादी वादग्रस्त घरात अतिक्रमण करतात म्हणून किनगांव पोलीस ठाण्यात मी तक्रार केली होती, हे खरे आहे. हे खरे की, अतिक्रमणाची तक्रार ठाणे अंमलदार श्री.गुणाले घेण्यास पैशांची मागणी करतात अशी मी गुणालेविरुध्द तक्रार दाखल केली होती.

**न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक ०२/०९/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**